पुढारी

सोमवार, ४ एप्रिल २०२२

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात डॉ. एस. एन. पाटील फौंडेशन, तुरुकवाडी (ता. शाहूवाडी) यांच्या वतीने ग्रामस्थ व स्वयंसेवकांच्या आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन डॉ. एस. एन. पाटील यांच्या हस्ते झाले. प्रत्येकाने किमान दररोज ४५ मिनिटे चालणे गरजेचे आहे. त्यात सातत्य ठेवावे, असा सल्ला दिला. डॉ. पंकज पाटील यानी आहार व आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. प्रज्ञा पाटील यांनी महिलांचे आरोग्य विषयावर मार्गदर्शन केले. मारुती पाटील यांनी रक्तगट तपासणी केली.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले. प्रा. पी. आर. बागडे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. राजश्री पाटील, डॉ. प्रभा पाटील, प्रा. नम्रता ढाळे, प्रा. डॉ. वाय. डी. हरताळे, एस. पी. देसाई, श्रीराम बोंगे, ई. जी. मंगल उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ४ एप्रिल २०२२

संक्षिप्त

# 'विवेकानंद'मध्ये संख्याशास्त्र विभागातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** विवेकानंद कॉलेजमध्ये संख्याशास्त्र विभागाच्या वतीने दोन दिवसीय कार्यशाळा झाली. पायथॉन सॉफ्टवेअरची ओळख व आवश्यकता विद्यार्थ्यांना माहिती करून देणे कार्यशाळेचा उद्देश होता. कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुजित कदम, शरद मेंगाणे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रास्ताविक संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. वर्षा पवार यांनी केले. प्रा. पूनम पाटील यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी प्रा. अशोक भोसले, प्रा. अजित पवार, प्रा. आशियाना मकानदार, प्रा. मेघा लोहार उपस्थित होते.

04/2022

पुढारी सोमवार, ४ एप्रिल २०२२ MY कोल्हापूर

# 'विवेकानंद'मध्ये नवउद्योजकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर** : विवेकानंद कॉलेजच्या व्यक्तिमत्त्व विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र आणि उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'नवउद्योजकांसाठी शासकीय योजना' या विषयावर कार्यशाळा झाली. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी प्रवीण कालिंदे यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक सनी काळे यांनी प्रास्ताविक केले. केंद्र समन्वयक समीक्षा फराकटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.